पिंपरी चिंचवड महानगरपालिका- कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ ऍ़ण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी
२ रा मजला, वैद्यकिय विभाग, मुख्य प्रशासकीय इमारत,पिंपरी चिंचवड महानगरपालिका, मुंबई-पुणे हायवे लगत,
पिंपरी- ४११ ०१८

---

जाहिरात क्र. ११८ /२०१९
क्रमांक- वैद्य/९/कावि/ ४७४० /२०१९
दि.१३/ ११/२०१९

## Walk- in –Interview (थेट मुलाखत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ ऍ़ण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी अंतर्गत राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) अंतर्गत आशा स्वयंसेविका (ASHA) नियुक्ती कामी खालील नमुद केलेल्या शैक्षणिक पात्रता व अनुभव धारक उमेदवारांनाकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदनाम | रुग्णालय/दवाखाना | कामकाज कार्यक्षेत्र | रिक्त पदसंख्या | शैक्षणिक पात्रता व अनुभव | वय | मुलाखतीचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आशा स्वयंसेविका (ASHA) | आकुर्डी रुग्णालय | जाधववाडी | ०१ | किमान ८ (आठवी) उतीर्ण विवाहित महिला, उच्च शिक्षीत महिलांना प्राधान्य, शासकिय सेवेत लिंक वर्कर व आरोग्य विषयक कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य. तसेच स्थानिक,आदिवासी, विधवा, परितक्त्या महिलांना व स्वयंसेवी संस्थेची कार्यकर्ती यांना प्राधन्य. | किमान २५ ते कमाल ४५ वर्षे | दि. २६/ ११ /२०१९ सकाळी १० ते ११ वा.पर्यंत. |
| | | भोसरी रुग्णालय | धावडे वस्ती | ०१ | | | |
| | | | सदगुरुनगर | ०१ | | | |
| | | | चक्रपाणीवसाहत | ०१ | | | |
| | | | मोशी दवाखाना परिसर | ०१ | | | |
| | | | डुडुळगांव | ०१ | | | |
| | | | दिघी (आदर्शनगर व भारतमातानगर) | ०१ | | | |
| | | वाय.सी.एम.रुग्णालय | लांडेवाडी/फुलेनगर | ०१ | | | |
| | | | नेहरुनगर-गवळीमाथा | ०१ | | | |
| | | सांगवी रुग्णालय | फुगेवाडी दवाखाना परिसर | ०१ | | | |
| | | जिजामाता रुग्णालय | पिंपळे सौदागर- पवनानगर | ०१ | | | |
| | | | काळेवाडी | ०१ | | | |
| | | | एकुण- | १२ | | | |

**अटी व शर्ती-**

1. राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत भरण्यात येणा-या वरील पदाची निवड थेट मुलाखतीने करण्यात येईल.
2. सदरची पदे राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत राहतील, सदर पदांचा पिंपरी चिंचवड म.न.पा.आस्थापनेशी कसल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.
3. सदरची पदे केवळ प्रकल्प कामकाजासाठी तात्पुरत्या स्वरुपात भरावयाची असून ३१ मार्च २०२० पर्यंत अथवा प्रकल्प बंद होताच सदरील पदे आपोआप संपुष्टात येतील.
4. सदरची पदे पुर्णपणे केवळ प्रकल्प कामकाजासाठी तात्पुरत्या स्वरुपात भरावयाची असल्याने अर्जदारास कायमपदी नियुक्तीचा हक्क सांगता येणार नाही. ज्या दिवशी सोसायटीस सदर पदांची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटीशीशिवाय त्यांची सेवा समाप्त केली जाईल. याकामी नियुक्तीवेळी रु.१०० चे स्टॅम्प पेपरवर बंधपत्र (करारनामा) करुन द्यावा लागेल.
5. सदर जाहिरातीमधील पदसंख्येमध्ये बदल होऊ शकतो.
6. सदरची भरती रद्द करणे अथवा स्थगित करणे तसेच निवड/नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार मा.आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी राखुन ठेवलेले आहेत.
7. मुलाखतीच्या वेळापत्रकामधील दिनांकास १ तासामध्ये म्हणजे सकाळी १० ते ११ वाजेपर्यंत या वेळेत जेवढे उमेदवार उपस्थित असतील अशा उमेदवादांची हजेरी नोंदवून व त्यांचेकडून विहित नमुन्यातील अर्ज व कागदपत्रे घेण्यात येतील. त्यानंतर उपस्थित असलेल्या उमेदवारांची मुलाखतीसाठी नोंदणी करणेत येणार नाही व याबाबतचा अंतिम निर्णय सदस्य सचिव तथा वैद्यकिय संचालक पि.चिं.म.न.पा. यांचा राहील.
8. आशा स्वयंसेविका जाहिरातीमध्ये नमुद कलेल्या कामकाज क्षेत्राची स्थानिक/कायमची रहिवाशी असावी. जर जाहिरातीमध्ये नमुद कार्यक्षेत्राची आशा स्वयंसेविका उपलब्ध न झाल्यास लगतच्या कार्यक्षेत्रातील आशा स्वयंसेविका यांचे पात्र अर्जांचा विचार केला जाईल.

9. आशा स्वयंसेविकेस मासिक ठोक वेतन, मानधन अथवा कोणताही एकत्रित दरमहा भत्ता अदा केला जाणार नाही

10. नियुक्त आशा स्वयंसेविकेस शासन आदेशानुसार कामावर आधारित मोबदला डी.बी.टी.व्दारे थेट बँक खात्यावर अदा केला जाईल व शासनाकडून वेळोवेळी प्राप्त सुचना लागु राहतील.

11. सदर पदभरतीची निवड व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात येईल.

12. सदर पदांची मुलाखत १५ गुणांची असेल.

13. सदर पदाचे मुलाखतीमध्ये खालील प्रमाणे गुण देण्यात येतील.

अ) किमान ८ वी पास महिला असणे आवश्यक, ८ वी ते १० वी पास असल्यास शुन्य गुण व त्यापुढील प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या पात्रतेसाठी ०२ गुण या प्रमाणे गुण देण्यात येतील. (उदा.१२ वी पास असल्यास ०४ गुण, निवड समितीस जास्ती जास्त ०६ गुण देणेत येतील.)

ब) आरोग्य विषयक कामकाजाच्या अनुभव प्रत्येक वर्षाच्या अनुभवासाठी ०१ गुण देण्यात येतील. चांगल्या स्वयंसेवी संस्थेची कार्यकर्ती असल्यास अधिक गुण देण्यात येतील. (जास्ती जास्त ०५ गुण देण्यात येतील.)

क) विधवा/परितक्त्या महिला असल्यास ०२ गुण देण्यात येतील.

ड) उत्तम संभाषण व प्रोत्साहन कौशल्यास जास्तीत जास्त ०२ गुण देण्यात येतील.

14. मुलाखतीस पात्र असलेल्या उमेदवारांनी खालील कागदपत्रांसह स्वखर्चाने मुलाखतीत राहवे. त्यांना कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता देय नाही.

**<u>कागदपत्रे-</u>**

१. इच्छुक व पात्र उमेदवारांनी थेट मुलाखतीला येताना म.न.पा.वेबसाईट www.pcmcindia.gov.in वर दिलेल्या नमुन्यातील अर्ज, शैक्षणीक अर्हता प्रामणपत्रे व खालील कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रती जोडाव्यात. (अर्जासोबत मुळ कागदपत्रे जोडून नयेत.) २. पासपोर्ट साईज फोटो ३. जन्म दाखलेचा पुरावा (जन्माचा दाखला/शाळा सोडल्याचा दाखला) ४. रहिवाशी दाखला ५. ओळख प्रमाणपत्र ६. अनुभव प्रमाणपत्र

15. मुलाखतीचे ठिकाण- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय, १ ला मजला चाणक्य हॉल,पिंपरी पुणे- ४११ ०१८.

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त (१)**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

| कार्यालयाने भरावयाची माहिती | | |
|---|---|---|
| **अर्ज पात्र/अपात्र** | **अपात्र करण्याचे कारण** | **अर्ज तपासणी करणार अधिकारी/कर्मचारी नाव,पदनाम व स्वाक्षरी** |
| | | |

**आशा स्वयंसेविका पदासाठी अर्जाचा नमुना**

| या ठिकाणी पासपोर्ट साईज फोटो चिटकवावा. |
|---|

**प्रति,**
**मा.सदस्य सचिव,**
कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली
वेलफेअर सोसायटी पी.सी.एम.सी.
२ रा मजला, वैद्यकिय विभाग, मुख्य प्रशासकीय इमारत,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, मुंबई-पुणे हायवे लगत, पिंपरी- ४११ ०१८

**विषय- आशा स्वयंसेविका या पदासाठी अर्ज**

**महोदय,**

संदर्भीय जाहीरातीनुसार मी ------------------------------------ पद **आशा स्वयंसेविका** हया तात्पुरत्या स्वरुपातील हंगामी पदासाठी आवश्यक अर्हता धारण करीत असून निवड होण्याकरीता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

माझी तपशीलवार माहिती खालील प्रमाणे-

१) संपूर्ण नांव- ---------------------------------------------------------------------------

२) सध्याचा पत्रव्यवहाराचा संपर्ण पत्ता---------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------------------------

३) मोबईल क्रमांक --------------------------------------------------------------------------

४) ई-मेल आयडी------------------------------------------------------------------------------

५) धर्म- ---------------------- ६) जात-------------- ७) प्रवर्ग- ------------------------

८) जन्मतारीख------------------------ व वय --------------------------------------

९) अर्जदाराची माहिती-

| अ.क्र. | पात्रतेच्या अटी | अर्जदाराने भरावयाची माहिती |
|---|---|---|
| १ | शैक्षणिक पात्रता | |
| २ | कामाचा अनुभव (वर्षामध्ये लिहावे ) | |
| ३ | विधवा परितक्त्या (होय किंवा नाही लिहावे) | |
| ४ | संभाषण कौशल्य व प्रोत्साहन कला अवगत (होय किंवा नाही लिहावे) | |

१०)  तांत्रिक व इतर अर्हता तपशील- -------------------------------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------------------------------------------------------------

वर नमुद केलेला तपशील खरा व बराबर असून त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकिची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे मिळालेली तात्पुरत्या स्वरुपातील हंगामी नोकरीवरुन कमी करण्यास मी पात्र राहीन, तसेच माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई प्रस्तावीत होईल, याची मला जाणीव आहे.

स्थळ- अर्जदारची सही-

दिनांक- / /२०१९ (नांव- )

**टिप :** १) अर्जदाराने शैक्षणिक पात्रता व कामाच्या अनुभवाचे प्रमाण पत्र सोबत जोडावेत.

२) अपुर्ण भरलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.